Since 1954
Affiliated to NFPW & INTUC
Regd No. 1657

# पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन

Since 1954
Affiliated to NFPW & INTUC
Regd No. 1657

मित्रहो,

संपूर्ण भारतात पसरलेल्या करोना महामारीच्या या काळात आपल्या **ओ.एन.जी.सी.** ने कार्य अविरत चालू ठेवले तसेच खडतर परिस्थिती वर मात करून आपण अखंडितपणे आपले काम बजावित आहोत. आज परिस्थिती हळूहळू पूर्वपदावर येत असताना **पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियनने** कामगार हित संबंधित वेळोवेळी अस्थापनेशी पत्रव्यवहार केले आणि काही ज्वलंत विषयावर आपण रिजनल लेबर कमिशनर यांच्याकडे सुद्धा पत्रव्यवहार केलेला आहे. (ओ.टी./सी.ऑफ) तसेच या कसोटीच्या काळात देखील वैयक्तिक भेट घेवून सल्ला मसलत करून अस्थापनेला कामगार हिताच्या सूचना केल्या व अमलात देखील आणल्या.

बरेच दिवस ऑफशोअर कामगारांशी थेट भेट सध्या घेता येत नसल्याने व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे सध्याच्या परिस्थितीचे अस्थापनेचे ऑफशोअर बद्दल असलेले धोरण, विचार, निती याचे आकलन तुम्हांला असावे तसेच फिल्ड संबंधित असणाऱ्या विविध अडी अडचणी व सध्याच्या ज्वलंत विषयावर **पी.ई.यू.चे** असणारे धोरण तसेच करावी लागणारी व्युहरचना या बाबतीत एक सखोल चर्चा करून आपण आपली पुढील वाटचाल सगळयांचे मत विचारात घेवून ठरविणार आहोत त्यासाठी सध्या ऑफशोअरमध्ये कार्यरत असलेले **पी.ई.यू. पदाधिकारी व सक्रिय कार्यकर्त्यांनी** व्हिडिओ कॉन्फरन्सिंगसाठी लागणारी तरतूद करून आपल्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना वेळ निश्चित करून कळवावा ही अपेक्षा.

जनरल सेक्रेटरी
पी.ई.यू. मुंबई



कामगार एकता जिंदाबाद

